पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-६
सभावृत्तांत

दि.- ४/ ९ /२०१३ वेळ- दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये बुधवार दि. ४/ ९ /२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

1. मा.गव्हाणे सुरेखा शंकर अध्यक्षा
2. मा.आल्हाट मंदा उत्तम
3. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
4. मा.वाबळे संजय मल्हारराव
5. मा.मडिगेरी वर्षा विलास
6. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
7. मा.सुपे आशा रविंद्र
8. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
9. मा.गोफणे अनुराधा देविदास
10. मा.महेशदादा किसन लांडगे
11. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
12. मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
13. मा.लोंढे शुभांगी संतोष
14. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
15. मा.ननवरे जितेंद्र बाबा
16. मा.सावळे सिमा रविंद्र
17. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
18. मा.भोसले राहूल हनुमंत
19. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
20. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
21. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
22. मा.शेंडगे आशा सुखदेव
23. मा.मोटे किरण बाळासाहेब
24. मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-प्र.प्रशासन अधिकारी, मा.साळवी –कार्यकारी अभियंता, स्थापत्य क-प्रभाग, मा. संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता (पापु), श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्री.लगस- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोकरे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.काळे- उपअभियंता, स्थापत्य, श्री.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, श्री. राजेंद्र शिंदे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.घुबे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.माने- उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.जगताप- उपअभियंता स्थापत्य, श्रीमती पाठक- उपअभियंता ड्रेनेज, श्री.पाटील- उपअभियंता, विदयुत, श्री.देशमुख- उपअभियंता, विदयुत, श्री.पुजारी-उपअभियंता (पुल व प्रकल्प), श्री.राजेंद्र जावळे- उपअभियंता, (ड पापु), श्री.विजय भोजने उपअभियंता, स्थापत्य,

श्री.संजय कांबळे- उपअभियंता (ड्रेनेज), श्री.उल्हास भालेराव -क.अभियंता, विदयूत, श्री. देवकर जे.डी.- क.अभियंता (झोनिपू स्थापत्य), श्री.आढळे-उद्यान निरीक्षक

मा.अध्यक्षा- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

-----

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- १) प्रभाग क्र. ६ मधील मोशी गावठाण (उत्तर लक्ष्मीनगर) येथील एका चौकास नामफलक मिळणेबाबत निवेदन- मा.मंदाताई आल्हाट यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- २) प्रभाग क्र. ६ मधील मोशी केंद्रीय विहार येथील चौकास नाम फलक मिळणेबाबत निवेदन- मा.मंदाताई आल्हाट यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- ३) दापोडी संकुलातील जुन्या संडास व मुतारी तोडुन नवीन बांधण्याबाबत- मा.रमाताई ओव्हाळ व मा.आशा सुपे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- ४) नामकरण संदर्भात- मा.राहुल भोसले व मा. किरण मोटे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- ५) स्वागत कमानीस नामकरण करणेबाबत- मा.जितेंद्र ननावरे व मा.सिमा सावळे यांचे पत्र.

विषय क्रमांक- ६) भोसरी उड्डाणपुलाखाली चक्रपाणी वसाहत प्रभाग लगत (चक्रपाणी रस्ता ते संत ज्ञानेश्वर कार्यालय) टॉयलेट / मुतारी बसविणेबाबत- मा.सुनिता गवळी व मा.सुरेखा गव्हाणे यांचे पत्र.

विषय क्रमांक- ७) माई वडेवाली चौकात सिग्नल बसवणेबाबत- मा.सुनिता गवळी व मा.संजय काटे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- ८) बोपखेल येथील गणेश विसर्जन घाट स्वच्छ व दुरुस्त करणेबाबत- मा.संजय काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- ९) दापोडी येथील हॅरिसब्रिज गणेश विसर्जन घाट स्वच्छ व दुरुस्त करणेबाबत-मा.संजय काटे व मा. विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- १०) प्रभाग क्र. ६४ येथील बोपखेल येथील चौकास व रस्त्यास नामकरणाबाबत-संजय काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक- ११) दापोडी संकुलातील हुतात्मा भगतसिंग विदयामंदीर शाळेत प्रार्थना व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हॉल बांधण्याबाबत- मा.रमाताई ओव्हाळ व मा.आशा सुपे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

विषय क्रमांक-१२) फुगेवाडी येथील प्रभाग क्र. ६२ मधील झालेल्या इमारतीचा काही भाग धोकादायक झाला असल्याने पाडण्यात यावा- मा.राजेंद्र काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि.४/९/२०१३ चे पत्र.

------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली—

सूचक- मा.सिमा सावळे अनुमोदक- मा.विनया तापकीर

भोसरी येथील महापालिकेच्या रुग्णालयामध्ये लैंगिक अत्याचार झाल्याने दि. ४/९/१३ रोजीची सभा निषेध म्हणून दहा मिनिटासाठी तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----

मा.अध्यक्षा- भोसरी येथील महापालिकेच्या रुग्णालयामध्ये झालेल्या लैंगिक अत्याचाराचा निषेध करुन दु.३.१० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

सही/-
(गव्हाणे सुरेखा शंकर)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-६
सभावृत्तांत
(दिनांक ४/ ९ /२०१३ (दु.३.००) ची तहकूब सभा)

दि.- ४/९/२०१३ वेळ दुपारी ३:१० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची दिनांक ४/९/२०१३ दु.३.०० ची तहकूब सभा बुधवार दिनांक ४/९/२०१३ रोजी दुपारी ३.१० वाजता क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.गव्हाणे सुरेखा शंकर अध्यक्षा
२) मा.आल्हाट मंदा उत्तम
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.वाबळे संजय मल्हारराव
५) मा.मडिगेरी वर्षा विलास
६) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
७) मा.सुपे आशा रविंद्र
८) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
९) मा.गोफणे अनुराधा देविदास
१०) मा.महेशदादा किसन लांडगे
११) मा.श्रध्दा बाजीराव लांडे
१२) मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१३) मा.लोंढे शुभांगी संतोष
१४) मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१५) मा.ननवरे जितेंद्र बाबा
१६) मा.सावळे सिमा रविंद्र
१७) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
१८) मा.भोसले राहूल हनुमंत
१९) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
२०) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
२१) मा.शेंडगे आशा सुखदेव
२२) मा.मोटे किरण बाळासाहेब
२३) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-प्र.प्रशासन अधिकारी, मा.साळवी –कार्यकारी अभियंता, स्थापत्य क-प्रभाग, मा. संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत, मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता (पापू), श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्री.लगस- सहा.आरोग्याधिकारी, श्री.भोकरे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.काळे- उपअभियंता, स्थापत्य, श्री.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, श्री. राजेंद्र शिंदे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.घुबे- उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.माने- उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.जगताप- उपअभियंता स्थापत्य, श्रीमती पाठक- उपअभियंता ड्रेनेज, श्री.पाटील- उपअभियंता, विदयुत, श्री.देशमुख- उपअभियंता, विदयुत, श्री.पुजारी-उपअभियंता (पुल व प्रकल्प), श्री.राजेंद्र जावळे- उपअभियंता, (ड पापु), श्री.विजय भोजने उपअभियंता, स्थापत्य,

श्री.संजय कांबळे- उपअभियंता (ड्रेनेज), श्री.उल्हास भालेराव -क.अभियंता, विदयूत, श्री. देवकर जे.डी.- क.अभियंता (झोनिपू स्थापत्य), श्री.आढळे-उद्यान निरीक्षक

मा.अध्यक्षा- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

-----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ८३ विषय क्रमांक – १
दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा. मंदाताई आल्हाट अनुमोदक-मा.विनया तापकीर
संदर्भ- मा.मंदाताई आल्हाट यांचे दि.४/९/२०१३ पत्र.

प्रभाग क्र.६ मोशी गावठाण (उत्तर लक्ष्मीनगर) येथील चौकास फुले आंबेडकर चौक असे नाव द्यावे अशी स्थानिक नागरीकांची मागणी आहे. तसेच येथील स्थानिक नागरीक श्री.भाऊसाहेब अडागळे, श्री.जाधव भिमराव लहु, सौ.उषा वाघमारे, सौ.भावना नाखले, सौ.राणी फडते, सौ.सुनिता राजेंद्र थोरात, यांची जोरदार मागणी आहे. त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८४ विषय क्रमांक – २
दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.मंदाताई आल्हाट अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ- मा. मा.मंदाताई आल्हाट यांचे दि.४/९/२०१३ पत्र.

प्रभाग क्र. ६ मधील मोशी केंद्रीय विहार समोरील संघर्ष प्रतिष्ठाण सर्व्हिस रोड वरील चौकास श्री. स्वामी समर्थ चौक असे नाव देण्याचे सुचविले आहे. त्यासाठी पुढील नागरीकांची नावे आहेत. श्री. पंकज शिवाजी पवार, श्री.संदेश हडवळे, श्री. मनोज एरडे, श्री.संतोष राठोड, श्री.संदिप पखाले, श्री.हरीष चौधरी, श्री.हरिदास जठार, श्री.दत्तराम गवस, श्री.लोळगे, श्री.बांगर साहेब, श्री. हर्षल वाडेकर, श्री.किशोर देवकर, श्री.योगेश गडगे इ. तसेच वरील ठिकाणी नागरीक व प्रवाशी येत असतात तेव्हा या चौकाना नामफलक नसल्याने अतिशय तारांबळ होत आहे त्यासाठी या चौकास नाम फलकाची अतीशय गरज आहे तेव्हा या चौकास लवकरात लवकर नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -८५ विषय क्रमांक – ३
दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.रमाताई ओव्हाळ अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ- मा.मा.रमाताई ओव्हाळ व मा.आशा सुपे यांचे दि. ४/९/१३ चे पत्र.

दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग विदयामंदीर येथील मुतारी व संडास ब्लॉक पुणे महानगरपालिकेच्या काळातील असल्यामुळे मुतारी व संडास ब्लॉक हे जुने झाल्यामुळे मोडकळीस आलेले आहे व येथील एकुण मुला-मुलींची संख्या १७२५ एवढी जास्त प्रमाणात असल्यामुळे सदरचे मुतारी व संडास ब्लॉक कमी पडत आहेत. त्यामुळे येथील मुलं व मुली बाहेरच्या परिसरात शौचालय व लघवी करतात त्यामुळे या परिसरामध्ये घाण व दुर्गंधी पसरुन त्यांना आजाराला बळी पडावे लागत आहे तरी येथील मुतारी व संडास ब्लॉक नवीन बांधण्यास त्यांची संख्या वाढवण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | शाळा क्रमांक | मुली | शाळा क्रमांक | मुले |
|---|---|---|---|---|
| १ | कन्या क्र. ३१ | २१४ | मुले क्र. ३७ | २८५ |
| २ | कन्या क्र. ५३ | २४२ | मुले क्र. ७६ | १७५ |
| ३ | कन्या क्र.७३ | २६७ | मुले क्र. १२१ | १९० |
| | एकूण | ७२३ | एकूण | ६५० |

क्र. ९३ उर्दू शाळा (मुले + मुली) = एकूण = ३५२

एकूण ७ शाळा इमारतीमध्ये भरतात एकूण विदयार्थी संख्या = १७२५

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८६ विषय क्रमांक – ४

दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा.राहुल भोसले अनुमोदक-मा.किरण मोटे

संदर्भ- मा. राहुल भोसले व मा.किरण मोटे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

नेहरुनगर प्रभाग क्र. ३८ मधील हॉटेल शितल समोरील विठ्ठलनगरकडे जाणा-या रस्त्याला श्री.आई माताजी मंदीर मार्ग असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८७ विषय क्रमांक – ५

दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक-मा.सिमा सावळे

संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे व मा.सिमा सावळे यांचे पत्र.

प्रभाग क्र. ३७ महात्मा फुलेनगर येथील वाय.सी.एम.भोसरी रस्त्याशेजारील होणा-या स्वागत कमानीस लोकशाहीर अण्णाभाऊ साठे असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८८ विषय क्रमांक – ६

दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा.सुनिता गवळी अनुमोदक-मा.सुरेखा गव्हाणे

संदर्भ- मा.सुनिता गवळी व मा.सुरेखा गव्हाणे यांचे पत्र.

चक्रपाणीवसाहत प्रभागालगत भोसरी उड्डाणपुलाखाली सार्वजनीक मुतारी / शौचालय नसल्याने पुलाखाली असणारे भटके लोक, रिक्षावाले व इतर प्रवासी पुलाच्या कॉलमच्या बाजूचा वापर मुतारीसारखा करीत असल्याने तेथील घाण पुणे नासिक रस्त्यावर येवून जाणा-या येणा-यांच्या अंगावर उडत आहे.

सार्वजनिक स्वच्छतेचा गंभीर प्रश्न असल्याने सदर ठिकाणी एफआरपी शौचालय / मुतारी लवकरात लवकर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ८९ विषय क्रमांक – ७

दिनांक -४/९/२०१३ विभाग- विदयुत क

सूचक- मा.सुनिता गवळी अनुमोदक-मा.संजय काटे

संदर्भ- मा.सुनिता गवळी व मा.संजय काटे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

भोसरी येथील माई वडेवाले चौकात वाहतूक कोंडी मोठयाप्रमाणात होते वाहतूक सुरळीत साठी सिग्नल बसवणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ९०
विषय क्रमांक – ८
दिनांक -४/९/२०१३
विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.संजय काटे
अनुमोदक-मा.विश्वनाथ लांडे
संदर्भ- मा.संजय काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

सालाबादा प्रमाणे गणेश उत्सव दि. ९ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर या दरम्यान साजरा होत आहे तरी बोपखेल येथील नदीवरील घाट दुरुस्त करणे लाईट व्यवस्था करणे व साफसफाई इत्यादी कामे करण्यासाठी संबंधीत विभागांना योग्य त्या सूचना करण्यास व गणेश विसर्जनापुर्वी सर्व व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - ९१
विषय क्रमांक – ९
दिनांक -४/९/२०१३
विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.संजय काटे
अनुमोदक-मा.विश्वनाथ लांडे
संदर्भ- मा.संजय काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

सालाबाद प्रमाणे गणेश उत्सव दि. ९ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर या दरम्यान साजरा होत आहे तरी दापोडी येथील नदीवरील हॅरिसब्रिज येथील घाट दुरुस्त करणे लाईट व्यवस्था करणे व साफसफाई इत्यादी कामे करण्यासाठी संबंधीत विभागांना योग्य त्या सूचना देणेत येत असून गणेश विसर्जनापुर्वी सर्व व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ९२
विषय क्रमांक – १०
दिनांक -४/९/२०१३
विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.संजय काटे
अनुमोदक-मा.विश्वनाथ लांडे
संदर्भ- मा.संजय काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

प्रभाग क्र. ६४, बोपखेल, गणेशनगरमधील स.नं. १५६/४, (पाण्याच्या टाकीजवळ), आळंदीकडून बोपखेल गावाकडे जाणा-या रस्त्यावरील चौकास गणपतराव घुले पाटील चौक व त्यालगतच्या रस्त्यास, त्या सर्वेमधील, रस्त्यास कै. रामचंद्र घुले पाटील पथ असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ९३
विषय क्रमांक – ११
दिनांक -४/९/२०१३
विभाग- स्थापत्य क
सूचक- मा.रमाताई ओव्हाळ
अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ- मा.रमाताई ओव्हाळ व मा.आशा सुपे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग विदयामंदीर शाळेमध्ये एकूण विदयार्थी संख्या १७२५ इतकी आहे. सदरच्या विदयार्थ्यांना हॉल नसल्यामुळे त्यांना एकत्र प्रार्थना व सांस्कृतिक कार्यक्रम करता येत नाही. त्यामुळे त्यांना आपआपल्या वर्गामध्येच प्रार्थना व कार्यक्रम करावे लागत आहेत. तरी येथे कन्या शाळा क्र. ७३ च्या वरती असणा-या टेरेस वरती लोखंडी गर्डर व पत्रा वापरुन प्रार्थना व सांस्कृतिक हॉल उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | शाळा क्रमांक | मुली | शाळा क्रमांक | मुले |
|---|---|---|---|---|
| १ | कन्या क्र. ३१ | २१४ | मुले क्र. ३७ | २८५ |
| २ | कन्या क्र. ५३ | २४२ | मुले क्र. ७६ | १७५ |
| ३ | कन्या क्र. ७३ | २६७ | मुले क्र. १२१ | १९० |
| | एकूण | ७२३ | एकूण | ६५० |

क्र. ९३ उर्दू शाळा (मुले + मुली) = एकूण = ३५२

एकूण ७ शाळा इमारतीमध्ये भरतात. एकूण विदयार्थी संख्या = १७२५

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ९४ विषय क्रमांक – १२

दिनांक -४/९/२०१३ विभाग- स्थापत्य क

सूचक- मा.राजेंद्र काटे अनुमोदक-मा.विश्वनाथ लांडे

संदर्भ- मा.राजेंद्र काटे व मा.विश्वनाथ लांडे यांचे दि. ४/९/२०१३ चे पत्र.

प्रभाग क्र. ६२ मधील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची शाळेच्या इमारतीचा काही भाग धोकादायक झाला असल्याने त्याठिकाणी मुलांच्या जीवीताला धोका निर्माण झाला आहे. सदर धोकादायक भाग काढून टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(गव्हाणे सुरेखा शंकर)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कप्रस/कावि/ ३७६ /२०१३
दि. ३० / ९ /२०१३

प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.